# प्रेस नोट

## आंबोली बेळगांव रोडवर हातकणंगले येथील व्यापाऱ्यास लुटणाऱ्या टोळीस स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग सिंधुदुर्ग यांचे पथकाकडून जेरबंद

---

दि.१३.०५. २०१९ रोजी हातकणंगले जि. कोल्हापुर येथील व्यापारी उमेश वसंतराव पिसे हे गोवा येथुन हातकणंगले या ठिकाणी आपले इर्टिगा वाहनाने जात असताना पाच अज्ञात आरोपीत यांनी त्यांचा स्कॉरपिओ गाडीने पाठलाग करुन उमेश वसंतराव पिसे यांची गाडी अडवुन त्यांचे अपहरण करुन त्यांना दांडयांनी मारुन व पिस्टल दाखवुन त्यांचे अंगावरील सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम १ लाख ९० हजार रुपये असा एकूण ५ लाख ५६ हजार रुपयाांवर दरोडा टाकुन उमेश पिसे यांना बेळगांव या ठिकाणी टाकुन पळून गेलेले होते. सदरबाबत उमेश पिसे यांनी सावंतवाडी पोलीस स्टेशनला अज्ञात पाच आरोपीत यांचे विरुद्ध तक्रार दिलेली होती. सदर घटनेने सिंधुदुर्ग जिल्हयातील व्यापारी तसेच सामान्य नागरींकामध्ये दहशत निर्माण झालेली होती. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीत यांचा शोध घेण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री दिक्षीत गेडाम, अपर पोलीस अधीक्षक श्री निमित गोयल तसेच कणकवली विभागाच्या सहा पोलीस अधीक्षक श्रीमती भाग्यश्री नवटके यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील यांचे नेतृत्वाखाली पोलीस पथ्क निर्माण केलेले होते. पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील , पोलीस उप निरीक्षक श्री रविराज फडणीस तसेच पोहेकॉ/ आशिष गंगावणे, पोना/ कृष्णा केसरकर, पोकॉ/ संकेत खाडये, पोकॉ/ रवि इंगळे, पोकॉ/ स्वप्निल तोरस्कर यांनी अज्ञात आरोपीत यांचा सर्वतोपरी प्रयत्नाने शोध घेतला, आपले गोपनीय बातमीदार सतर्क केले. तसेच आरोपीत यांनी गुन्हयाचे वेळी वापरलेली वाहन स्कॉरपिओ गाडीबाबत तपास केला. तसेच फिर्यादी यांचेकडे काम करणारे नोकर, ड्रायव्हर तसेच मित्र यांचेबाबत तपास केला होता. सदर तपासात फिर्यादी उमेश पिसे यांचेकडे पुर्वी ड्रायव्हर म्हणुन नोकरीस असणारा इसमाचा सदर गुन्हयात सहभाग असल्याबाबत माहीती मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे इतर पाच साथीदार यांची नांवे निष्पन्न करुन त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हा केल्याची प्रथम दर्शनी कबुली दिलेली आहे. आरोपीत यांचे ताब्यातुन स्कॉरपिओ गाडी क्रमांक व रोख रक्कम १० हजार रुपये हस्तगत करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास याआधी सावंतवाडी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. धनवाडे करीत होते. आंता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील हे करीत आहेत. वरील सर्व आरोपीत यांना आज रोजी मा न्यायालयात हजर करुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात येणार आहे.

---

पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग करीता.